महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८ / १० /२०२५

प्रति,
१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# रेशीम उद्योग

## प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून त्याचा भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अत्यल्प व अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

रेशीम उद्योग हा कृषि व वन संपत्तीवर आधारीत उद्योग असुन यामध्ये रोजगाराची मोठी क्षमता आहे. प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या क्षेत्रामध्ये या उद्योगास पोषक वातावरण असल्याने रेशीम उत्पादन करण्यास भरपूर वाव आहे. कृषि विकास दरवृद्धी बरोबरच ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत करणारा हा उद्योग आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना उदा.सिल्क समग्र-२ व म.ग्रा.रो.ह.यो. ई.च्या माध्यमातून रेशीम उद्योगास प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा १ मध्ये देखील सदर घटकासाठी चांगला प्रतिसाद मिळाला आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसार करणेसाठी या घटकाचा समावेश नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे.

## उद्दिष्टे:

१. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावसमूहातील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करून उत्पन्नात वाढ करणे.
२. रेशीम उद्योगाचा समुह आधारीत सर्वांगीण विकास करणे.
३. तुती उत्पादन व रेशीम उद्योगात महिलांचा सहभाग वाढविणे.
४. रेशीम उद्योगातून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे.

## लाभार्थी निवडीचे निकष :

१. प्रकल्पांतर्गत ५ हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेले शेतकरी या घटकासाठी पात्र राहतील.
२. रेशीम उद्योग या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल.
३. प्रकल्पांतर्गत तुती लागवडीसाठी लाभार्थ्याकडे किमान जमीन धारणा ०.४० हेक्टर असणे आवश्यक आहे.
४. इच्छुक लाभार्थ्याकडे मध्यम ते भारी व पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी.
५. लागवड केलेल्या तुती क्षेत्रासाठी सिंचनाची पुरेशी सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.
६. रेशीम उद्योग या घटकाचा लाभ यापूर्वी शासनाच्या इतर योजनेतून घेतला असल्यास सदर लाभार्थी पात्र असणार नाही.

## सर्वसाधारण सूचना

१. प्रकल्पांतर्गत रेशीम उदयोग या बाबी अंतर्गत खालील ३ घटकांचा समावेश आहे.
    - तुती लागवड
    - किटक संगोपनगृह बांधकाम
    - किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य

२. रेशीम उदयोगामध्ये समाविष्ट ३ घटकांची अंमलबजावणी ही टप्प्याटप्प्याने करावयाची आहे. ज्यामध्ये प्रथम टप्प्यात लाभार्थीद्वारा प्रक्षेत्रावर तुती लागवड करणे, त्यानंतर किटक संगोपन गृह बांधकाम व किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य याची अंमलबजावणी करणे.

३. उपरोक्त क्रम लक्षात घेता स्थळ पाहणी व पूर्वसंमती देणाऱ्या अधिकाऱ्याने लाभार्थ्याचे मागील टप्प्यावरील घटकाचे काम पूर्ण झाल्याची खातरजमा करूनच मंजुरी द्यावी.
    A. उदा. I.लाभार्थ्याने किटक संगोपनगृह बांधकाम या घटकाची मागणी केल्यास लाभार्थ्याकडे तुती लागवड
        I. असल्याची खात्री करणे.
        II. II.लाभार्थ्याने किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य याची मागणी केल्यास लाभार्थ्याकडे तुती
        III. लागवड व किटक संगोपन गृह बांधकाम यांचे काम पूर्ण झाल्याची खात्री करणे

४. रेशीम किटक संगोपनगृह ६०X२२ फूट (लांब X रुंद ) १३२० चौ.फूट बांधकाम करणे गरजेचे आहे व त्यामध्ये पाला साठवणुकीची खोली किमान १०X८ फूट बांधणे बंधनकारक आहे.

५. रेशीम किटक संगोपनगृहाच्या नजीकच निर्जंतुकीकरण टाकी (प्लास्टरसह ५X४X३ फूट) बांधणे गरजेचे आहे.

६. प्रकल्पांतर्गत सदर घटकाचा लाभ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने दिला जाईल.

## रेशीम उदयोग या घटका अंतर्गत समाविष्ट घटक व अर्थसहाय्य:

नानाजी देशमुख कृषि संजीवनी (टप्पा-२) प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या बाबीमधील समाविष्ट घटकासाठी दिलेल्या मापदंडानुसार सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना ७५ टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ टक्के यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील. तसेच अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थींना दिलेल्या मापदंडानुसार ९० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

| अ.क्र. | तपशील | एकक | मंजूर मापदंडानुसार खर्च रु. | प्रकल्प अर्थ सहाय्याचे प्रमाण मंजूर मापदंडानुसार रु. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण (७५%) | अनुसूचित जाती, व जमाती (९०%) |
| १ | तुती लागवड | प्रति एकर | ६०,००० | ४५,००० | ५४,००० |
| २. | किटक संगोपनगृह बांधकाम | ११०० चौ.फुट | ३,२५,००० | २,४३,७५० | २,९२,५०० |
| ३ | किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य | प्रति लाभार्थी | ४८,५०० | ३६,३७५ | ४३,६५० |
| | **एकूण** | | **४,३३,५००** | **३,२५,१२५** | **३,९०,१५०** |

संदर्भ - १. सिल्क समग्र - २ योजनेच्या मार्गदर्शक सूचना सन २०२२ -२३

२.महाराष्ट्रासाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र -२ योजनेअंतर्गत सामान्य मार्गदर्शक तत्वांना PMC ने दिलेली मंजुरी, दि. १८/०१/२०२३.

अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

## लाभार्थी

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज करावा.
२. लाभार्थी सदर घटकाची अंमलबजावणी संयुक्त मालकीच्या क्षेत्रावर करत असल्यास इतर खातेदारांचे ना हरकत प्रमाणपत्र अपलोड करावे.
३. पूर्वसंमती मिळाल्यापासून घटकाची अंमलबजावणी पूर्ण करून ६० दिवसात अनुदान मागणी प्रकल्पाच्या DBT पोर्टलद्वारे करावी.
४. अनुदान मागणी करताना संबंधित घटकाचे मूळ देयके अपलोड करावे.
५. लाभार्थ्याने सदर व्यवसाय किमान ५ वर्षे करणे आवश्यक आहे.
६. तुती रोपाकरिता शासकीय रेशीम फार्म, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापीठे, शासकीय रोपवाटीका, सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीका इ. ठिकाणांवरून तुती रोपे उपलब्ध करून घ्यावीत.
७. लाभार्थी तुती रोपांची/बेण्यांची खरेदी व्यावसायिक तुती रोपवाटिका धारक किंवा तुती लागवड करणाऱ्या इतर शेतकऱ्यांकडून करू शकतात. तसेच लाभार्थ्यास स्वतः च्या क्षेत्रावरही तुती रोपे तयार करण्याची मुभा राहील. तथापि तुती रोपांच्या गुणवत्तेबाबतची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

## ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

१. इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छाननी समूह सहाय्यक व सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मदतीने करून अर्जाच्या पात्रते/अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
२. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकाचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

## समूह सहाय्यक

१. इच्छुक लाभार्थी यांना ऑनलाईन अर्ज व प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व बैठकीचे इतिवृत्त संकेतस्थळावर अपलोड करणे.
३. शेतकऱ्याच्या अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांना त्रुटी पूर्ततेसाठी मदत करणे.
४. लाभार्थ्यांस रेशीम उद्योग या घटकाच्या अटी, शर्ती व अंमलबजावणी बाबत समजावून सांगावे.

## सहाय्यक कृषि अधिकारी

१. लाभार्थीचा ऑनलाईन अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छाननी आधारे अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन प्रकल्प स्थळ संबंधित घटकासाठी योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणे तसेच सदर घटकाचा लाभ लाभार्थ्याने अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.

३. डेस्क-२ वरती उपलब्ध करून दिलेला ONLINE स्वरूपातील अहवाल आवश्यक खातरजमा करून भरण्यात यावा.
४. प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून फोटो अपलोड करावे.
५. लाभार्थ्याने अर्जात मागणी केलेल्या घटकानुसार तुती लागवडीचे अंदाजपत्रक, किटक संगोपनगृह बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करून अपलोड करावे.
६. रेशीम उदयोग या घटकाच्या मापन पुस्तिका तयार करणेकामी मंडळ कृषि अधिकारी यांना सहाय्य करणे.
७. प्राप्त झालेल्या अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास या त्रुटींची संबंधित शेतकऱ्याकडून लगेच पूर्तता करून घ्यावी.

## उप कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
३. मोका तपासणी वेळी मंडळ कृषि अधिकारी यांचे समवेत उपस्थित राहून सहाय्य करणे.

## मंडळ कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याने अपलोड केलेले देयके व अनुषंगिक कागदपत्रांची छाननी करणे.
२. लाभार्थ्याने पूर्ण केलेल्या घटकाची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मोका तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी तांत्रिक मापदंडानुसार करण्यात आली आहे काय याची खातरजमा करणे.
४. तुती लागवड व किटक संगोपनगृह बांधकाम यांची मापन पुस्तिकेतील नोंदी सहाय्यक कृषि अधिकारी व उप कृषि अधिकारी यांच्या मदतीने पूर्ण करणे.
५. विहित नमुन्यातील मोका तपासणी अहवाल, अनुदानाची परिगणना करून तयार करणे.
६. प्रकल्पाच्या डीबीटी प्रणालीवरती मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका,देयकांची साक्षांकित प्रत ई. कागदपत्रे अपलोड करून प्रकरण पुढील डेस्क वर पाठविणे .
७. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास DBT प्रणालीवर त्रुटी नमूद करून प्रकरण शेतकरी स्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

## तालुका कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याचा प्राप्त अर्ज, अर्जासोबत अपलोड केलेली कागदपत्रे, ग्राम कृषि विकास समिती बैठकीचे इतिवृत्त, डेस्क-२ वरील स्थळ पाहणी अहवाल व फोटो यांची छाननी करणे.
२. सदर लाभार्थ्याने अथवा त्याच्या कुटुंबातील सदस्याने सदर घटकाचा लाभ इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घेतला आहे काय याची खातरजमा करणे. त्यासाठी रेशीम विभागाशी समन्वय साधावा.
३. छाननी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास लाभार्थ्यास पूर्वसंमती प्रदान करणे.
४. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडून अपलोड करण्यात आलेली तुती लागवड, किटक संगोपन गृह बांधकामाचे अंदाजपत्रकाची तपासणी, पूर्वसंमती देण्यापूर्वी करणे.
५. लाभार्थ्यास प्रदान करण्यात आलेली पूर्वसंमतीच सदर अंदाजपत्रकांसाठी तांत्रिक मान्यता ग्राह्य धरण्यात यावी. तांत्रिक मान्यतेसाठी स्वतंत्र आदेश काढण्याची आवश्यकता नाही.
६. छाननी अंती अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्रुटी नमूद करून DBT प्रणालीद्वारे मागील डेस्क वर पाठविण्यात यावे.
७. लाभार्थी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र ठरत नसल्यास सदरील अर्जास पूर्वसंमती नाकारण्यात यावी.
८. प्रकल्प संचालक,आत्मा व उपविभागीय कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी रेशीम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.

९. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

## लेखाधिकारी

१. मोका तपासणी अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करणे.
२. मोका तपासणी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या अनुदान रकमेची पडताळणी करून योग्य असल्याबाबत खातरजमा करणे.
३. छाननी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगी कामी पुढील डेस्क वर पाठविणे.
४. छाननी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास DBT प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

## उपविभागीय कृषि अधिकारी

१. अनुदान प्रस्तावाची संपूर्ण छानणी करून शिफारशीत करण्यात आलेले अनुदान योग्य असलेबाबत पडताळणी करणे.
२. छानणी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीस अंतिम मान्यता देणे.
३. प्रकल्प संचालक,आत्मा व तालुका कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधून लाभार्थ्यांसाठी रेशीम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे.
४. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.
५. लाभार्थ्यास अनुदानाची द्विरुक्ती टाळण्यासाठी वेळोवेळी रेशीम संचालनालयाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा.
६. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.
७. योजनेचे संनियंत्रण करणे.

## जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

१. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. जिल्हा रेशीम अधिकारी यांच्या मदतीने क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे सदर घटक अंमलबजावणीचे प्रशिक्षण घेण्यात यावे.
३. योजनेचे संनियंत्रण करणे.

## प्रकल्प संचालक आत्मा

लाभार्थ्यांसाठी जिल्हा रेशीम अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रशिक्षण आयोजित करावे.

## विभागीय कृषि सहसंचालक:

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.

२. विभागस्तरावर सदर घटक राबविलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

**क्षेत्रीय पर्यवेक्षीय तपासणी** - योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व गुणवत्ता नियंत्रणासाठी क्षेत्रीय स्तरावरून पर्यवेक्षीय तपासणी करणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणात किमान तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी अधिकारी पदनाम | तपासणीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | तालुका कृषि अधिकारी | ५ % | |
| २ | उपविभागीय कृषि अधिकारी | ३ % | |
| ३ | नोडल अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय | किमान २ प्रकरणे प्रति माह | |
| ४ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ५ | नोडल अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| ६ | विभागीय कृषि सहसंचालक | किमान १ प्रकरण प्रति माह | |

## रेशीम उद्योग या घटकाअंतर्गत बाबींचे अंदाजपत्रक

प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या घटका अंतर्गत तुती लागवडीसाठी सहाय्य, कीटक संगोपन गृहाचे बांधकाम व कीटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य यांचा समावेश आहे.

### तुती लागवड खर्च प्रति एकर (रक्कम रु.)

| अ.क्र. | घटक | युनिट | युनिट किंमत | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| अ .मजुरी खर्च | | | | | |
| १ | ट्रॅक्टरच्या सहाय्याने जमीन तयार/मशागत करणे | तास | १,००० | ४ | ४,००० |
| २ | शेणखत देणे/पसरविणे | मनुष्य दिन | २९० | ८ | २,३२० |
| ३ | सरी वरंबे तयार करणे/खड्डे खोदणे | मनुष्य दिन | २९० | २० | ५,८०० |
| ४ | तुती लागवड करणे/रोपे लावणे | मनुष्य दिन | २९० | १० | २,९०० |
| ५ | नांगरणी/जमीन कुळविणे (वर्षातून दोन वेळा) | मनुष्य दिन | २९० | ४ | १,१६० |
| ६ | पाणी देणे - वर्षातून ४० वेळा | मनुष्य दिन | २९० | २० | ५,८०० |
| ७ | निंदणी/खुरपणी - वर्षातून ४ वेळा | मनुष्य दिन | २९० | १६ | ४,६४० |
| ८ | खत देणे - वर्षातून ३ वेळा | मनुष्य दिन | २९० | ३ | ८७० |
| | **एकूण मजुरी खर्च** | | | | **२७,४९०** |
| आ. सामुग्री खर्च | | | | | |
| १ | शेणखत | मेट्रिक टन | १,२७० | ८ | १०,१६० |
| २ | तुतीची रोपे | संख्या | २.५ | ६,००० | १५,००० |
| ३ | व्हर्मीकम्पोस्ट/जैविक आणि द्रव्य खते | एकूण रक्कम | | | २,००० |
| ४ | खतांचा वापर @ २०:२०:२० किलो NPK/एकर (पेरणीच्या २ महिन्यानंतर) (२०० किलो अॅमोनियम सल्फेट, १२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३५ किलो म्युरेट ऑफ पोटश आणि आणखी एक डोस N@२० किलो) | | | | ४,२०० |
| ५ | साधने/उपकरणे | एकूण रक्कम | | | १,१५० |
| | **एकूण सामुग्री खर्च** | | | | **३२,५१०** |
| | **एकूण एकंदर (अ+ब )** | | | | **६०,०००** |

## रेशीम किटक संगोपनगृह ६० x २२ फूट (लांब x रुंद),१३२० चौ. फुट मॉडेलसाठी लागणाऱ्या खर्चाचे एक एकर तुती लागवड नुसार अंदाजपत्रक

| अ.क्र. | कामाचा तपशील | १५० ते २५० अंडीपुंज/बॅच | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकक | दर रु. ३१२/- म. दिवस | मात्रा दिवस | एकूण मजुरी दिवस | दर रु. ३१२ | एकूण मजुरी |
| अ) | मजुरी | | | | | | |
| १ | शेडसाठी जागा लेव्हलिंग, वाट तयार करणे | मी.$^{३}$ | ५ | ८ | ४० | ३१२ | १२४८० |
| २ | वाळू चाळणी, सिमेंट वाळू खडी मिक्सिंग करणे व त्याची पाया भरणी करिता वाहतूक | मी.$^{३}$ | १२ | ५ | ६० | ३१२ | १८७२० |
| ३ | पाया खोदणी, पाईप करिता खड्डे तयार करणे, पाईप उभा करणे, कॉंक्रीटिंग तयार करणे/ पाया भरणे.लिफ चेंबर (१० x ८) व निर्जंतुकीकरण टाकी प्लास्टर सह (५ x ४ x ३) बांधकाम करणे इ. | मी.$^{३}$ | २० | १० | २०० | ३१२ | ६२४०० |
| ४ | मुरूम वाहतूक व आतील जमिनीवर मुरूम टाकणे | मी.$^{३}$ | ४५ | २ | ९० | ३१२ | २८०८० |
| ५ | मुरूम धूमस करणे | मी.$^{३}$ | ६ | २ | १२ | ३१२ | ३७४४ |
| ६ | बांधकामा अंतर्गत पाणी मारणे | | १ | ११ | ११ | ३१२ | ३४३२ |
| ७ | शेडसाठी पाईप कापणे, फिटिंग | | १२ | ५ | ६० | ३१२ | १८७२० |
| | **अ) एकूण अकुशल मजुरी** | | | ० | **४७३** | **२१८४** | **१४७५७६** |
| ब) | कुशल कामाचा तपशील | | | | | | |
| अ.क्र. | साहित्याचे नाव | प्रमाण | मात्रा | | दर रु. | देय रक्कम रु. | शेरा |
| १ | लोखंडी पाईप/ अँगल ३" किंवा ४" साईज | नग/किलो | २० " लांबीचे ६ पाईप किंवा २९८ किलो | | १३४ | ४०००० | सिमेंट पत्रे ऐवजी लोखंडी पत्रे, सिमेंट पाईप/ कॉलम ऐवजी लोखंडी पाईप, अधिक मूल्याच्या वस्तू तसेच सिमेंट, वाळू करिता इस्टीमेट पेक्षा जास्त खर्च शेतकरी स्वच्छेने करू शकतील. |
| २ | लोखंडी स्क्वेअर पाईप/ अँगल १.५" किंवा २" साईज | नग/किलो | ४०० | | ७५ | ३०००० | |
| ३ | पत्रे सिमेंट/लोखंडी | नग/किलो | ३० | | २००० | ६०००० | |
| ४ | पत्राचे क्लंप ७ ते ८ फुट | किलो | २० | | ११० | २२०० | |
| ५ | स्क्रू व इतर | किलो | २०.४ | | १०९ | २२२४ | |
| ६ | सिमेंट, वाळू, विटा इ. | किलो | लागणारे प्रमाणात | | | ४०००० | |
| | **ब) एकूण कुशल रक्कम** | | | | | **१७४४२४** | |
| ७ | **क)** जनमाहिती फलक | | रुंदी ३ x ४ लांबी फुट | | एकत्रित | ३००० | विटा रेती सिमेंटच्या फलकावर योजनेचे नाव, शेतकरी नाव कामाचा कोड व एकूण रक्कम व अदा रक्कम नमूद असावी. |
| | **एकूण रक्कम (अ + ब+क)** | | | | | **३२५०००** | |

टिप: किटक संगोपनगृहाचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी किटक संगोपन गृहामध्ये कोबा/फरशी तसेच बाजूने २.५ - ३ फुट उंचीची भिंत बांधणे आवश्यक आहे.

## किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य (रक्कम रुपयामध्ये)

| अ.क्र. | बाब | युनिट | प्रति युनिट किंमत | १५० dfls साठी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक |
| | **अ. किटक संगोपन साहित्य** | | | | |
| १ | HD PVC shoot किटक संगोपन रॅक/लोखंडी स्टँड्स | प्रती चौ.फूट | १० | १०५० | १०,५०० |
| २ | प्लास्टिक ट्रे (३' x २') रेशीम कीडे हातळणीसाठी | संख्या | ५०० | १५ | ७,५०० |
| ३ | बेड सफाई नेट | संख्या | ३० | १२० | ३,६०० |
| ४ | प्लास्टिक कोलॅप्सिबल माउंटेज | संख्या | ७० | १३५ | ९,४५० |
| ५ | पॉवर स्प्रेयर | संख्या | ७,५०० | १ | ७,५०० |
| ६ | सोलर लाईटिंग सिस्टम | संख्या | | १ | ५,००० |
| | **एकूण** | | | | **४३,५५०** |
| | **ब. निर्जंतुकीकरण साहित्य** | | | | |
| | **अ. सामान्य कीटकनाशक** | | | | |
| १ | अस्थ्र | १०० ग्रॅम | १७५ | ८ | १,४०० |
| २ | सॅनिटेक | ५०० मि.ली. | १०० | ८ | ८०० |
| ३ | ब्लीचिंग पावडर | किलो | ३५ | १५ | ५२५ |
| ४ | चुना | किलो | १५ | २५ | ३७५ |
| | **आ. बेड कीटकनाशक (अंकुश,राशक, विजेता इ.)** | पाकिटे | ७० | २५ | १,७५० |
| | उझी ट्रॅप (प्रौढ उझी माशांना आकर्षित करण्यासाठी केमोट्रॅप) | संख्या | ५० | २ | १०० |
| | **एकूण** | | | | **४,९५०** |
| | **एकूण एकंदरीत (अ+ब)** | | | | **४८,५००** |

## हमीपत्र
## रेशीम उद्योग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"रेशीम उद्योग"** या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. रेशीम उद्योग या घटकाचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीला घेता येईल, याची मला जाणीव आहे.
२. सदर घटकाचा लाभ मी अथवा माझ्या कुटुंबातील इतर सदस्यांनी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून घेतलेला नाही.
३. सदर घटकांतर्गतची कामे मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकषांनुसार पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.
४. सदर घटकांतर्गत प्रकल्पाने मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणकापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च मी स्वत: करील.
५. सदर व्यवसाय किमान ५ वर्षे करणे बंधनकारक आहे ,याची मला जाणीव आहे.
६. प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी माझ्याकडून फसवणूक किंवा खोटी माहिती, कागदपत्रे दिली गेली असे आढळून आल्यास प्रकल्प व्यवस्थापन कक्षास अनुदान थांबवण्याचा किंवा वसूल करण्याचा पूर्ण अधिकार असेल.
७. मी प्रकल्पाच्या अधिकारी/ प्रतिनिधींना सदर घटकाशी संबंधित प्रकल्प स्थळ, साहित्य किंवा नोंदी तपासण्यासाठी परवानगी देईन आणि पूर्ण सहकार्य करीन.
८. मी प्रकल्पांतर्गत लाभ घेतलेल्या घटकाचे प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निर्धारित कालावधीपर्यंत देखभाल व जतन करणार असल्याची हमी देत आहे. निर्धारित कालावधीपर्यंत जतन व देखभाल न केल्यास मला दिलेले अनुदान वसूलपात्र राहील याची मला जाणीव आहे.
९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

मोका तपासणी अहवाल

अ. तुती लागवडीसाठी

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तपासणी दिनांक | |
| ४. | घटक | तुती लागवड |
| ५. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ६. | तुती लागवड – पूर्व संमतीनुसार मंजूर क्षेत्र (हे.) | ०.४० हे. |
| ७. | प्रत्यक्ष तुती लागवड क्षेत्र (हे.) | |
| ८. | लागवड केलेल्या तुतीचे वाण | |
| ९. | सिंचनाची सोय आहे काय ? | |
| १०. | तुती लागवड या घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली आहे काय ? | |
| ११. | लाभार्थ्यास तुती लागवडीसाठी शिफारस करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम | |

मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थीने तुती लागवड केलेली आहे. पुरवठा केलेले रेशीम उदयोग साहित्य प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील दिलेल्या निकषांप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी केलेले आहे. इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी

(श्री. )

स्वाक्षरी-------------------------

मंडळ कृषि अधिकारी -------------------------

(श्री. )

दिनांकित स्वाक्षरी

## मोका तपासणी अहवाल

### ब . किटक संगोपन गृह बांधकाम

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तपासणी दिनांक | |
| ४. | घटक | **किटक संगोपनगृह बांधकाम** |
| ५. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ६. | किटक संगोपन गृह बांधकाम तपशील | लांबी -------X रुंदी............ चौ फूट. |
| ७. | किटक संगोपनगृहाचे बांधकाम मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केले आहे काय ? | |
| ८. | किटक संगोपनगृह बांधकामाकरिता शिफारस करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम | |

मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थीने तुती लागवड केकेली आहे. पुरवठा केलेले रेशीम उदयोग साहित्य प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील दिलेल्या निकषांप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी समिती समक्ष खरेदी केलेले आहे. इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेल्ने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी

(श्री. )

स्वाक्षरी------------------------

मंडळ कृषि अधिकारी ------------------------

(श्री. )

दिनांकित स्वाक्षरी

# मोका तपासणी अहवाल

## क . किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तपासणी दिनांक | |
| ४. | घटक | **किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य** |
| ५. | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ६. | **किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य** | |

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | युनिट | प्रति युनिट किंमत | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे | | मोका तपासणीप्रमाणे तपशील | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| **अ. किटक संगोपन साहित्य** | | | | | | | |
| I | HD PVC SHOOT किटक संगोपन रॅक/लोखंडी स्टँड्स | प्रती चौ.फूट | १० | १०५० | १०,५०० | | |
| II | प्लास्टिक ट्रे (३' X २') रेशीम कीडे हातळणीसाठी | संख्या | ५०० | १५ | ७,५०० | | |
| III | बेड सफाई नेट | संख्या | ३० | १२० | ३,६०० | | |
| IV | प्लास्टिक कोलॅप्सिबल माउंटेज | संख्या | ७० | १३५ | ९,४५० | | |
| V | पॉवर स्प्रेयर | संख्या | ७,५०० | १ | ७,५०० | | |
| VI | सोलर लाईटिंग सिस्टम | संख्या | | १ | ५,००० | | |
| | **एकूण अ** | | | | **४३,५५०** | | |
| **ब. निर्जंतुकीकरण साहित्य** | | | | | | | |
| **अ .सामान्य कीटकनाशक** | | | | | | | |
| I | अस्थ्र | १०० ग्रॅम | १७५ | ८ | १,४०० | | |
| II | सॅनिटेक | ५०० मि.ली. | १०० | ८ | ८०० | | |
| III | ब्लीचिंग पावडर | किलो | ३५ | १५ | ५२५ | | |
| IV | चुना | किलो | १५ | २५ | ३७५ | | |
| **आ. बेड कीटकनाशक (अंकुश,राशक, विजेता इ.)** | | पाकिटे | ७० | २५ | १,७५० | | |
| I | उझी ट्रॅप (प्रौढ उझी माशांना आकर्षित करण्यासाठी केमोट्रॅप) | संख्या | ५० | २ | १०० | | |
| | **एकूण ब** | | | | **४,९५०** | | |
| | **एकूण अ + ब** | | | | **४८,५००** | | |

| | | |
|---|---|---|
| ७. | किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्य मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आहे काय ? | होय/नाही |
| ८. | किटक संगोपन व निर्जंतुकीकरण साहित्याकरिता शिफारस करण्यात येत असलेल्या अनुदानाची रक्कम | |

मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थीने तुती लागवड केलेली आहे. पुरवठा केलेले रेशीम उदयोग साहित्य प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील दिलेल्या निकषांप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी समिती समक्ष खरेदी केलेले आहे. इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेल्ने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी

(श्री. )

स्वाक्षरी------------------------

मंडळ कृषि अधिकारी ------------------------

(श्री. )

दिनांकित स्वाक्षरी

**प्रपत्र**

**पर्यवेक्षीय तपासणी अहवाल**

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री./श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री./श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री./श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. _______ |
| ६. | बाब | **रेशीम उद्योग** |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | प्रत्यक्ष तुती लागवड क्षेत्र (हे.) | |
| १०. | प्रकल्पाचा तपासणी तपशील | रेशीम उद्योग साहित्याचा तपशील–<br>दर संख्या एकूण किंमत अभिप्राय<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६. |
| ११. | देयकाची एकुण रक्कम (रु.) | |
| १२. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |

| | | |
|---|---|---|
| १५. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १६. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १७. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

तपासणी अधिकारी, श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

इतर अधिकारी श्री.
पदनाम.
(स्वाक्षरी)

लाभार्थी/ प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव..........................)